मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# प्रारूप मतदार यादी 6 नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार

## महापालिका निवडणुक: 14 नोव्हेंबरपर्यंत नागरिकांना हरकती व सूचना नोंदविण्याची संधी




**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील विधानसभा मतदारसंघांची प्रभागनिहाय विभाजित करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी ६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या यादीवर ६ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत नागरिकांना हरकती व सूचना नोंदविण्याची संधी आहे. प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचनांवर छाननी, सुनावणी व निर्णय घेण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयानिहाय सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी, अनिल भालसाकळे, माणिक चव्हाण आणि सुनील भागवानी यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आले आहेत.

महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील २०५-चिंचवड विधानसभा, २०६-पिंपरी विधानसभा, २०७-भोसरी विधानसभा आणि २०३-भोर विधानसभा मतदारसंघ (ताथवडे गाव) या विधानसभा मतदारसंघांच्या मतदार यादी प्रभागनिहाय विभाजन करून तयार करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी ६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या यादीवर ६ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर २०२५ या काळात नागरिक आपल्या हरकती व सूचना महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील मतदार यादी कक्षात तसेच सर्व ८ क्षेत्रीय कार्यालयांत प्रत्यक्ष दाखल करू शकतात. या यादीवरील हरकती व सूचनांवर छाननी, सुनावणी व निर्णय घेण्यासाठी सहशहर अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांची क्षेत्रीय कार्यालयानिहाय प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

यामध्ये 'अ' व 'फ' क्षेत्रीय कार्यालयासाठी अजय सूर्यवंशी, 'ब' व 'ग' क्षेत्रीय कार्यालयासाठी अनिल भालसाकळे, 'ड' व 'ह' क्षेत्रीय कार्यालयासाठी माणिक चव्हाण आणि 'क' व 'इ' क्षेत्रीय कार्यालयासाठी सुनील भागवानी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्राधिकृत अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी संबंधित क्षेत्रीय अधिकारी व कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची सहायक प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित अधिकारी प्रारूप मतदार यादीबाबत नमुना 'अ' व 'ब' मध्ये प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांची तपासणी करून आवश्यक अहवाल प्राधिकृत अधिकाऱ्यांना सादर करावा, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# रूपीनगरमधील अंतर्गत रस्त्यांची दुरावस्था; नागरिक त्रस्त

## रूपीनगरमधील परिस्थिती, भर पावसाळ्यात नागरिकांची पाण्यासाठी कसरत

**पिंपरी | प्रतिनीधी**

रूपीनगर परिसरातील अंतर्गत रस्त्यांच्या दुरावस्थेने नागरिक, वाहनचालक त्रस्त झाले आहेत. महापालिकेला टॅक्स भरल्यानंतरही मुलभूत सुविधा मिळत नसल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. अंतर्गत रस्त्याची दुरावस्था म्हणजे अनेक ठिकाणी रस्ते खचले असून, ठिकठिकाणी मोठ-मोठे खड्डे आहेत. अनेकदा दुचाकीवरून घसरण्याचे प्रकार याठिकाणी घडले आहेत. रूपीनगर परिसरातील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती तत्काळ करावी अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

कोयना सोसायटीमधून जाणारा मुख्य रस्ता, रूपीनगर मुख्य रस्ता, गणेशनगर चौक ते सरस्वती सोसायटीला जाणारे मुख्य रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. मागील अनेक वर्षापासून या रस्त्यांची दुरुस्ती न केल्याने रस्ते पूर्ण खचले आहेत. मोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात दुचाकी अथवा चारचाकी चालवताना खड्ड्याचा अंदाज येत नाही. अनेकदा अपघाताच्या घटना घडल्या आहेत. अंतर्गत रस्ते महापालिकेने लक्ष देऊन तत्काळ दुरुस्त करावे अशी मागणी सातत्याने केली जात आहे. मात्र अंतर्गत रस्त्यांच्या कामासाठी बजेट नसल्याची उत्तरे महापालिका प्रशासनाकडून येत आहेत.



> रस्त्यांची दुरुस्ती करण्याची मागणी केल्यानंतर पावसाची कारणे दिली जात आहेत. मात्र मागील तीन वर्षापासून अंतर्गत रस्त्याची दुरुस्ती केलेली नाही. डांबरीकरणही झालेले नाही. अंतर्गत रस्त्याच्या कामाला बजेट नसल्याचे सांगितले जाते. नागरिकांडून कर मोठ्या प्रमाणात आकारला जातो तशाच सुविधाही दिल्या पाहिजेत. दुसरीकडे कामांना करोडो रूपये खर्च केले जातात, मग आमच्या परिसरातील रस्त्यांकडे दुर्लक्ष का ? लवकरात-लवकर रस्त्यांची दुरुस्ती करून डांबरीकरण करावे. म्हणजे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळेल.
>
> **- धनंजय भालेकर, शिक्षण मंडळ मा.सभापती.**

> रूपीनगरमधील साईनाथ सोसायटी, लक्ष्मी हौसिंग सोसायटी, बल्लाळेश्वर, घारजाई सोसायटी तसेच बैठ्या घरातील नागरिकांना नादुरुस्त रस्त्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. दुचाकीवरून ये-जा करताना जीव मुठीत धरून गाडी चालवावी लागते. परिसरात पाण्याच्या लाईनसाठी, केबलसाठी खोदलेले रस्ते नादुरुस्त अवस्थेत आहेत. कित्येक महिन्यांपासून या रस्त्यांची दुरावस्था झाली, मात्र महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केल्यानंतरही दुर्लक्ष केले जात आहे.
>
> **- राहूल पवार, महाराष्ट्र प्रदेश संघटक.**

> मागील मे महिन्यांपासून सातत्याने पाऊस सुरु आहे. पाऊस पूर्णपणे बंद झाल्याशिवाय डांबरीकरणाचे प्लांट सुरु केले जात नाहीत. त्यामुळे रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम रखडले आहे. रूपीनगर परिसरातील अंतर्गत रस्त्यांची बजेटची तरतूद नसल्याने विलंब होतो आहे. मुख्य रस्त्यावरील खड्डे व डांबरीकरण पाऊस बंद होताच सुरु केले जाईल.
>
> **- शिवाजी चौरे, स्थापत्य विभाग फ प्रभाग.**

# मोशी प्राधिकरणातील वीजग्राहक नागरिकांना दिलासा!

## 'आरएमयू' बसवण्याच्या कामाला सुरुवात; आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी प्राधिकरणातील सेक्टर क्रमांक ४, ६, ९ तसेच गंधर्व नगरी परिसरातील नागरिकांना गेल्या काही महिन्यांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याचा मोठा त्रास सहन करावा लागत होता. या परिसराला महावितरणच्या सेक्टर १० उपकेंद्रातून कार्यान्वित जलवायु विहार या उच्चदाब विद्युत वाहिनीमार्फत वीजपुरवठा केला जातो. परंतु, या वाहिनीवर कुठेही तांत्रिक बिघाड झाल्यास संपूर्ण लाईन बंद ठेवावी लागे, त्यामुळे पूर्ण परिसर अंधारात जात होता. ही समस्या आता कायमस्वरुपी सुटणार आहे.

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्यामुळे तीन ठिकाणी 'आरएमयू' बसवण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. आज या कामाची पाहणी कामगार नेते सचिन लांडगे यांनी केली. यावेळी माजी नगरसेविका नम्रता लोंढे, सामाजिक कार्यकर्ते योगेश लोंढे आणि सहकारी उपस्थित होते.

वीज ग्राहकांच्या या समस्येची दखल घेत आमदार महेश लांडगे यांनी महावितरण अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून तात्काळ तोडगा काढण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर कार्यकारी अभियंता श्री. देवकर आणि सहाय्यक अभियंता श्री. नरवडे यांच्यासह जागेचे सर्वेक्षण करण्यात आले. पाहणीदरम्यान तीन ठिकाणी RMU (RING MAIN UNIT) बसविण्यासाठी जागा निश्चित करण्यात आल्या. जलवायु विहार सोसायटी बाहेर, साधू वासवानी स्कूल कॉर्नर आणि महाराजा चौक परिसर या ठिकाणी RMU बसवण्यात येत आहेत.

दोन आरएमयू युनिट्स आधीच उपलब्ध झाल्यानंतर तिसरे युनिटही प्राप्त झाले असून, या आरएमयू बसवण्याच्या कामाचा शुभारंभ कामगार नेते सचिन लांडगे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी माजी नगरसेविका नम्रता लोंढे, सामाजिक कार्यकर्ते योगेश लोंढे आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.




> 'आरएमयू' युनिट्स बसविण्यामुळे उच्चदाब वाहिनीचे विभाजन करता येणार असून, पुढे कोणत्याही परिसरात बिघाड झाल्यास फक्त त्या भागाचा पुरवठा बंद ठेवता येईल आणि उर्वरित परिसर सुरळीत सुरू राहील. त्यामुळे वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना लक्षणीयरीत्या कमी होतील, तसेच तक्रारींचे निरसन जलदगतीने होईल. यामुळे मोशी प्राधिकरणातील नागरिकांना वारंवार होणाऱ्या विजेच्या अडचणींमधून मोठा दिलासा मिळणार आहे. भोसरी विधानसभा मतदार संघातील वीज पुरवठा सक्षम करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# पिंपरी-चिंचवडच्या राजनंदिनीचा राज्यस्तरावर "कांस्य नेम"

## दिल्लीत होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत कामगिरीची संधी; राष्ट्रीय खेळाडू अरुण पाडुळे यांचे मार्गदर्शन

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड राष्ट्रीय रायफल अकादमीमधील राष्ट्रीय खेळाडू अरुण पाडुळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेणारी नेमबाज कु. राजनंदिनी यादव हिने नागपूर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली.

१९ वर्षांखालील वयोगटात राजनंदिनीने महाराष्ट्रातून तिसरा क्रमांक पटकावत कांस्यपदक जिंकले असून, तिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या कामगिरीमुळे पिंपरी-चिंचवड शहरासह संपूर्ण महाराष्ट्रासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.





राजनंदिनी सध्या प्रशिक्षक आणि राष्ट्रीय नेमबाज अरुण पाडुळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहे. सातत्यपूर्ण सराव, एकाग्रता आणि दृढनिश्चय यांच्या जोरावर तिने अल्पावधीतच आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. या यशामुळे अकादमीमध्ये आनंदाचे वातावरण असून, सहकारी खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमींनी राजनंदिनीचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. राष्ट्रीय स्तरावरही ती महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला आहे.

> "राजनंदिनीने अत्यंत शिस्तबद्धपणे आणि सातत्याने सराव करून राज्यस्तरावर उल्लेखनीय यश मिळवले आहे. तिच्यातील नेमबाजीची जाण आणि एकाग्रता प्रभावी आहे. राष्ट्रीय स्पर्धेत ती आणखी उत्कृष्ट कामगिरी करेल, असा मला पूर्ण विश्वास आहे."
>
> **- अरुण पाडुळे, राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक.**

# पुण्यात शिस्तीसाठी कारवाईचा दंडुका

## दररोज तब्बल पाच हजार वाहनचालकांवर कारवाई, अनेक महत्त्वाच्या ठिकाणी ही मोहीम राबवण्यात आली

**पुणे | प्रतिनिधी**

वाहतूक शिस्त आणि रस्ते सुरक्षा निश्चित करण्यासाठी पुणे शहर वाहतूक पोलिसांनी या आठवड्यात मोठ्या प्रमाणावर कारवाई मोहीम राबवली. पुणे रेल्वे स्टेशन, स्वारगेट बस डेपो, कात्रज चौकांसह अनेक महत्त्वाच्या ठिकाणी ही मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत शहरामध्ये दररोज तब्बल पाच हजार वाहनचालकांवर कारवाई करण्यात येत आहे.

चुकीच्या दिशेने वाहन चालवणे, अनधिकृत पार्किंग, सिग्नल तोडणे अशा विविध नियमभंगांबद्दल या मोहिमेदरम्यान टेम्पो, ऑटोरिक्षा, दुचाकी आणि चारचाकी वाहनांवर जागेवरच दंड आकारण्यात आला. तसेच ऑनलाईन तपासणीद्वारे प्रलंबित ई-चलन असलेली वाहने ओळखण्यात आली आणि पुन्हा गुन्हा करणाऱ्यांवर विशेष लक्ष ठेवून कारवाई करण्यात आली.



### रॉंग साईड वाहन चालवणे आणि बेकायदेशीर पार्किंगवर लक्ष

» पुणे वाहतूक शाखेने चुकीच्या दिशेने वाहन चालवणे आणि बेकायदेशीर पार्किंग या दोन प्रमुख समस्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. अलीकडच्या महिन्यांत या कारणांमुळेच अपघात आणि कोंडीचे प्रमाण वाढले आहे. पुढील आठवड्यांतही अशी कारवाई सुरू ठेवण्यात येणार आहे, असे पोलिसांनी सांगितले. वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करा आणि सुरक्षित, सुरळीत वाहतुकीसाठी प्रशासनाला सहकार्य करा, असे आवाहन वाहनसंख्येने विक्रमी पातळी गाठलेल्या पुण्यात वाहतूक पोलिसांनी पुन्हा एकदा नागरिकांना केले आहे.

यासंदर्भात 'सीविक मिरर'सोबत संवाद साधताना वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव म्हणाले, "वाहनचालकांमध्ये शिस्त रुजवण्यासाठी आणि त्यांच्याकडून नियमांचे पालन करवून घेण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून अशा मोहिमा नियमितपणे राबविल्या जातात. १ ते ३० ऑक्टोबरदरम्यान एकूण १ लाख ५७ हजार २५६ प्रकरणांची नोंद झाली. त्यापैकी ३५ टक्के प्रकरणांमध्ये दंड भरला गेला. सहा टक्के प्रकरणे न्यायालयात पाठवली आहेत, तर ५९ टक्के प्रकरणांमध्ये चलन जारी करण्यात आले. यामध्ये सध्या ४५० कोटी रुपयांचा दंड प्रलंबित आहे."

"पुणे रेल्वे स्टेशन, स्वारगेट आणि कात्रज अशा प्रमुख चौकांवर नियमित कारवाई केली जाते. सरासरी दररोज पाच हजार दुचाकीस्वार, चारचाकी चालक आणि रिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाई केली जाते. विकेंडला नियम उल्लंघनांची संख्या किंचित कमी होते," असे निरीक्षण हिम्मत जाधव यांनी नोंदवले.

"वाहतूक कोंडी आणि वाहनांच्या गतीचा मागोवा नियंत्रण कक्षातील सहा मॉनिटर्समार्फत घेतला जातो. त्यासाठी चार पद्धती वापरल्या जातात. वायरलेस अहवाल, ११०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे थेट दृश्य, 'टॉम टॉम' ॲपशी जोडलेले गूगल मॅप आणि माझ्या कार्यालयातील मुख्य स्क्रीन. सकाळी ८ ते ११ आणि सायंकाळी ५ ते ९ हा कोंडीचा 'पिक पीरियड' असतो. पुणे हे जगातील चौथे सर्वाधिक कोंडीत अडकलेले शहर आहे," याकडे जाधव यांनी लक्ष वेधले.

### 'पुणे ट्रॅफिक पोलीस' ॲप ठरत आहे उपयुक्त

» वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव यांनी सांगितले, "आम्ही 'पुणे ट्रॅफिक पोलीस' (पीटीपी) नावाचे मोबाइल ॲप सुरू केले आहे. या ॲपवर नागरिक तिहेरी सीट, फॅन्सी नंबर प्लेट, फुटपाथवर पार्किंग, मोबाईल वापरत वाहन चालवणे, काळी काच (टिंटेड ग्लास) अशा १० प्रकारच्या उल्लंघनांचे फोटो अपलोड करू शकतात. दररोज सुमारे १,३०० तक्रारी प्राप्त होतात. त्यापैकी सरासरी २० टक्के नाकारल्या जातात आणि उर्वरित ८० टक्के प्रकरणांमध्ये २४ तासांत चलन जारी केले जाते."

### शहरात वाहनांचा वेग किती?

» "दररोज सकाळी ६ ते रात्री ११ या वेळेत ॲडॅप्टिव्ह ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीमद्वारे (एटीएमएस) ३२ मुख्य रस्त्यांवरील वाहतूक स्थिती आणि सुरक्षिततेवर लक्ष ठेवले जाते. ३१ ऑक्टोबर रोजी शहरातील सरासरी वाहनगती २२.६ किलामीटर प्रतितास इतकी होती. मागील १२ आठवड्यांचा डेटा पाहता सकाळी सरासरी वेग १९.९, संध्याकाळी १७.२ आणि दिवसाचा एकूण सरासरी वेग २१.२ किमी प्रतितास नोंदवला गेला," असे हिम्मत जाधव यांनी सांगितले.

# शहरातील रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी महापालिकेची 3 नोव्हेंबरपासून विशेष मोहीम...

## महापालिकेचा पथ विभाग आणि 15 क्षेत्रिय कार्यालयांची मिळून 15 टीम्सद्वारे हे काम करण्यात येणार

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील रस्ते खड्डे मुक्त होण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांचे स्वप्न सत्यात उतरणार आहे. कारण महापालिकेने ३ नोव्हेंबरपासून खड्डेमुक्त रस्ते विशेष अभियान राबविणाचा निर्णय घेतला आहे. महापालिकेचा पथ विभाग आणि १५ क्षेत्रिय कार्यालयांची मिळून १५ टीम्सद्वारे हे काम करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली.




महापालिकेकडून शहरात विविध सेवा वाहिन्या टाकण्यासाठी शासकीय, निमशासकीय व खासगी संस्थांना सशुल्क परवानगी दिली जाते. पथ विभागाकडून १ ऑक्टोबर ते ३१ एप्रिलपर्यंत खोदाईला परवानगी दिली जाते. त्यानंतर एक मे ला खोदाई बंद करून ३१ मे पर्यंत रस्ते दुरुस्त करणे बंधनकारक असते. तसेच पथ विभागाकडून पावसाळ्यापूर्वी शहरातील रस्ते दुरुस्ती केले जातात. मात्र, खोदाईनंतर दुरुस्तीची कामे योग्य प्रकारे केली जात नाहीत, त्यामुळे पावसाळ्यात रस्त्यांवर खड्डे पडतात. पावसाचे पाणी आणि खड्डे यामुळे वाहतुक मंदावते.

महापालिकेच्या विविध प्रकल्पांना, कामांना भेट देण्यासह आयुक्त नवल किशोर राम यांनी नागरी प्रश्न सोडवण्यावर भर दिला आहे. पाहणी दौऱ्याच्या दरम्यान त्यांना शहरातील रस्त्यावर पडलेल्या खड्डयांमुळे व अशास्त्रीय दुरुस्तीमुळे मोठी समस्या निर्माण झाल्याचे लक्षात आले. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी शहरात खड्डे मुक्त रस्ते करण्यासाठी विशेष अभियान राबवण्याचा निर्णय घेतला आहे. हे अभियान ३ नोव्हेंबरपासून सुरू केले जाणार आहे. यासाठी १५ पथके तयार करण्यात येणार आहे. या पथकांना प्रत्येकी १० – १० किलो मीटरची जबाबदारी दिली जाणार आहे. यासाठी ७ ठेकेदारांना काम दिले जाणार आहे. या कामात ठेकेदारांना एक रुपये सुध्दा फायदा होणार नाही, असेही आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.

> "सोमवार अर्थात ३ नोव्हेंबरपासून शहरातील रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात येणार आहे. यासाठी पथ विभाग आणि पंधरा क्षेत्रिय कार्यालयांच्या मिळून १५ टीम्स तयार करण्यात येणार आहेत. खड्डेमुक्त रस्ते अभियानासाठी रस्त्यांचे काम करणाऱ्या ठेकेदारांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. महिन्याभरात विशेष मोहीम राबवून सर्व रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी आमचे प्रयत्न राहातील."
>
> **- नवल किशोर राम, आयुक्त, पुणे महापालिका.**

# राजगड तालुक्यात भाजपकडून तगडी फौज

## झेडपी; पंचायत समितीसाठी 26 इच्छुक रिंगणात : मोर्चेबांधणीला वेग

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजगड (वेल्हे) तालुक्यात भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारीसाठी चुरस होणार आहे. तालुक्यात एकूण सहा जागांसाठी २६ प्रस्थापित, मातब्बर इच्छुक उमेदवारांनी दावेदारी पक्षाकडे सादर केली आहे. आजी – माजी पदाधिकारी, अनुभवी सरपंच-उपसरपंच, युवा नेते, महिला पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या या मोठ्या समावेशामुळे राजगड तालुक्यात सत्ता काबीज करण्यासाठी भाजपने कंबर कसली आहे.

भाजपचे राजगड तालुकाध्यक्ष राजू प्रभाकर रेणुसे यांनी माजी आमदार संग्राम थोपटे यांच्या नेतृत्वाखाली ही उमेदवारांची यादी जाहीर केली आहे, ज्यामुळे पक्षाचे संघटन आणि तयारी स्पष्ट होते. यादीत विविध क्षेत्रांतील जाणकार आणि प्रभावी चेहऱ्यांचा समावेश आहे.

मार्गासनी- वेल्हे बुद्रुक जिल्हा परिषद गटात ४ जण इच्छुक आहेत. नवीन चेहरेही स्पर्धेत आहेत.

विंझर – पानशेत जिल्हा परिषद गटात ५ जण इच्छुक आहेत. हा गट प्रतिष्ठेचा बनला असून, प्रबळ दावेदार रिंगणात उतरणार आहेत. पंचायत समिती गणांमध्ये महिला आणि युवा नेतृत्वाचा दबदबा दिसून येत आहे. पंचायत समितीच्या चारही गणांमध्ये भाजपकडून उमेदवारीसाठी मोठी स्पर्धा असून, महिला नेतृत्वाला पक्षाने दिलेले महत्त्व दिसून येत आहे.

या सर्व इच्छुकांमधून पक्षाकडून कोणाला तिकीट मिळेल, याबद्दल तालुक्यात जोरदार चर्चा सुरू आहे. भाजपकडून इच्छुकांची मोठी गर्दी आहे. लवकरच पक्षश्रेष्ठींच्या बैठकीत माजी आमदार संग्राम थोपटे व भाजपा जिल्हाध्यक्ष शेखर ओढणे, जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब गरुड, राजगड तालुकाध्यक्ष राजू प्रभाकर रेणुसे यांच्या नेतृत्वात अंतिम निर्णय होणार असून, उमेदवारी कोणाला मिळणार, याकडे वेल्हे तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे.



### प्रबळ उमेदवारीचा निकष

» एकाच वेळी २६ जाणकार आणि प्रभावी उमेदवारांची दावेदारी भाजपकडे आल्यामुळे वेल्ह्यात पक्षाची ताकद आणि विस्तार स्पष्टपणे दिसून आहे. उमेदवाराची विजय होण्याची क्षमता, पक्षनिष्ठा, सामाजिक समीकरण या त्रिसूत्रीवर भर दिला जाईल, असे पक्षसूत्रांनी सांगितले.

### मार्गासनी- विंझर गटात चुरस

» मार्गासनी – वेल्हे बुद्रुक गटात इच्छुक उमेदवारांची यादी- दिनकर धरपाळे (माजी जिल्हा परिषद सदस्य), दिनकर सरपाले (माजी सभापती), आकाश वाडघरे (माजी सभापती सविता आकाश वाडघरे यांचे पती), शिवाजी चोरघे (वांगणी उपसरपंच). विंझर – पानशेत जिल्हा परिषद गटात सुनील जागडे (भाजपा पुणे जिल्हा उपाध्यक्ष), विष्णू राऊत (पंचायत समिती माजी सदस्य), हनुमंत शिंदे (राष्ट्रीय अध्यक्ष गुरव समाज), शिवराज शेंडकर (चंद्रकांत शेंडकर उपसभापती यांचा मुलगा), देविदास हनमघर (सरपंच साईव बुद्रुक)

### प्रस्थापित नेत्यांची कसोटी

» पंचायत समिती गणातून इच्छुक उमेदवार- विंझर गण- राजू प्रभाकर रेणुसे (भाजपा वेल्हे तालुकाध्यक्ष), गणेश जागडे (माजी उपसरपंच आंबेड), सचिन बधे (तालुका कोषाध्यक्ष), सुभाष रानवडे (माजी सरपंच रुळे), सतीश लिम्हण (माजी सरपंच, विंझर). मार्गासनी गण- विशाल वालगुडे (माजी सरपंच मार्गासनी), रवींद्र दसवडकर (माजी भाजपा तालुकाध्यक्ष), प्रकाश बढे (माजी सरपंच सोंडे सरपाले), राहुल रणखांबे (भाजपा अनुसूचित जाती आघाडी तालुकाध्यक्ष).

# काकड आरतीपासून वैयक्तिक संपर्कापर्यंत उमेदवारांचा जोर

## आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिरंगुट-भूगाव गटातील इच्छुक उमेदवारांनी गावभेट दौऱ्यांना वेग दिला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिरंगुट-भूगाव गटातील इच्छुक उमेदवारांनी गावभेट दौऱ्यांना वेग दिला आहे. वैयक्तिक संपर्क वाढवून मतदारांशी नातं घट्ट करण्यासाठी उमेदवार विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होत असून, गावोगावी सुरू असलेल्या काकड आरतींनाही उपस्थित राहून संवाद साधत आहेत.

या गटासाठी जिल्हा परिषदेचे आरक्षण मागास प्रवर्गासाठी ठरले असून, पिरंगुट व भूगाव गणात सर्वसाधारण आरक्षण जाहीर झाले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती या दोन्ही निवडणुकांसाठी इच्छुकांच्या हालचालींना वेग आला आहे. हा गट परंपरेने राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जातो. 2007, 2012 आणि 2017 या तीनही निवडणुकांत राष्ट्रवादीचे उमेदवार विजयी झाले होते. पूर्वीचा पिरंगुट-बावधन गट हा बावधन आणि सूस गाव महापालिकेत गेल्याने आता नव्या प्रभागरचनेत पिरंगुट-भूगाव गट तयार झाला आहे.

2017 च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अंजली कांबळे यांनी जिल्हा परिषदेवर विजय मिळवला होता. पिरंगुट गणातून राधिका कोंढरे (राष्ट्रवादी काँग्रेस) आणि बावधन गणातून विजय केदारी (शिवसेना) हे विजयी झाले होते. आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) यांच्यात त्रिकोणी लढत होण्याची चिन्हे आहेत. वैयक्तिक संपर्क वाढवून मतदारांशी नातं घट्ट करण्यासाठी उमेदवार विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होत असून, गावोगावी सुरू असलेल्या काकड आरतींनाही उपस्थित राहून संवाद साधत आहेत.







### इच्छुक उमेदवार

» या गटात जिल्हा परिषद सदस्यपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून: माजी जिल्हा परिषद सदस्य शांताराम इंगवले, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाकडून: माजी सभापती महादेव कोंढरे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून: शिवआरोग्य सेनेचे जिल्हाध्यक्ष माधवराव (आबा) शेळके, युवासेनेचे उपजिल्हाधिकारी अमित कुडले आणि माजी सभापती भानुदास पानसरे हे इच्छुक असल्याचे समजते. या सर्व उमेदवारांनी आपल्या गटात आणि गावात मतदारांशी संपर्क साधत, श्रद्धेच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचण्याची रणनीती अवलंबली आहे.